# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

# गृहपाठ

## बी. ए. मराठी साहित्य

### द्वितीय वर्ष (सत्र ३ व सत्र ४)

### २०१७–१८

प्रती : १०००

# गृहपाठ लिहिण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी पुढील सूचना वाचाव्यात व त्याप्रमाणे गृहपाठांचे काम करावे.

१. बी. ए. (विशारद) सामाजिकशास्त्रे या अभ्यासक्रमातील गृहपाठ लेखन हा महत्त्वाचा आणि अनिवार्य भाग आहे. गृहपाठ लिहिण्यापूर्वी विद्यार्थ्याने संबंधित विषयाचे पुस्तक वाचून मगच गृहपाठ लिहिणे आवश्यक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचा विषयाचा अभ्यास होतो. स्वयंअध्ययनाची सवय व्हावी व उत्तरपत्रिका लेखनाचा सराव व्हावा, हाच गृहपाठ लेखनामागील हेतू आहे.

२. गृहपाठ लिहिताना पुस्तकातील मजकुराची केवळ नक्कल करू नये. विद्यार्थ्याने विषय समजून घेऊन गृहपाठ लिहिला आहे की नाही, हे जाणीवपूर्वक पाहिले जाते आणि त्याप्रमाणे गुण दिले जातात.

३. गृहपाठ त्यांच्या अनुक्रमानुसार व सलग लिहावेत. एक गृहपाठ संपल्यावर ठळक रेघ मारून पुढील ओळीवर अथवा नव्या पानावर पुढील गृहपाठ लिहावा. उत्तरात लाल शाईचा वापर करू नये. योग्य समास सोडावा.

४. मोठ्या प्रश्नांचे उत्तर ४० ते ५० ओळींत असावे. गरजेनुसार जास्त चालेल. टिपा लिहा प्रत्येकी २०–२५ ओळींत उत्तर असावे.

५. उत्तरात गरज नसताना १, २, ३....... असे आकडे घालण्याऐवजी योग्य परिच्छेद पाडावेत.

६. उत्तराला सुरुवात करताना प्रास्ताविक व उत्तराच्या शेवटी समारोप असेल, तर ते उत्तर अधिक चांगले मानले जाते.

**७. सत्र ३ व सत्र ४ चे गृहपाठ एकत्रित दिलेले आहेत याची नोंद घ्यावी.**

८. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार 'क्षेत्रीय कार्य' अथवा उपक्रम हा प्रश्न घालण्यात आला आहे. त्यासाठी अवांतर वाचन व सद्यःस्थितीतील घडामोडींचे निरीक्षण आवश्यक आहे.

## गृहपाठ सादर करण्याची मुदत

| सत्र | विना विलंबशुल्क | विलंब शुल्कासह |
|---|---|---|
| तिसरे | १५ ऑक्टोबर २०१७ | ३१ ऑक्टोबर २०१७ |
| चौथे | २८ फेब्रुवारी २०१८ | १५ मार्च २०१८ |

# मराठी साहित्य – (BMG-301) भाग – १

## सत्र ३

## ‘शबरी’, ‘विशाखा’, ‘व्यक्ती आणि वल्ली’

---

**गृहपाठ – १**

**प्रश्न – शबरी कादंबरीचे कथानक थोडक्यात लिहा.** **गुण : २०**

**उत्तर – प्रस्तावना –** लेखिकेचा परिचय – थोडक्यात कथानकाचे वर्णन – पात्रपरिचय – कथानकाचा कालखंड – दुस्या महायुद्धाच्या काळातील सामाजिक–राजकीय परिस्थितीचे वर्णन – स्त्रिया नोकरी करण्यासाठी बाहेर पडण्याची सुरुवात – आई नाराज – नव्या–जुन्याचा संघर्ष – मध्यमवर्गीय राहणीमान – सवयी – प्रेमविवाह – धंदा किंवा व्यवसाय करणाऱ्यांचे जग – शिक्षण क्षेत्रातील बदल – शबरी अभिरामचा संघर्ष – त्यांचे कौटुंबिक ताणतणाव – शबरीने घर सोडण्याचा घेतलेला निर्णय – हरिद्वारला गंगेवर गेल्यावर झालेले विचारांचे परिवर्तन – घरी परत येण्याचा निर्णय – समारोप.

**गृहपाठ – २**

**प्रश्न – शबरी कादंबरीतील वातावरण विशद करा.** **गुण : १०**

**उत्तर – प्रस्तावना –** लेखिकेचा परिचय – कादंबरीच्या सुरुवातीला जुन्या पद्धतीचे कौटुंबिक वातावरण – सामाजिक वातावरणात दुसऱ्या महायुद्धामुळे घडणारे बदल – नव्या–जुन्याचा संघर्ष – राहणीमानातील फरक – दुसऱ्या महायुद्धाच्या काळामुळे स्वातंत्र्यपूर्व मोर्चे – आंदोलने – सामाजिक वातावरण – राजकीय वातावरण – उदा. गंगाराम – शिक्षणक्षेत्रातील बदल – गांधी विचारांचा पगडा – महागाई – काळाबाजार – समारोप.

**गृहपाठ – ३**

**प्रश्न – १. गोदाकाठचा संधिकाल २. समिधाच सख्या कवितांचे रसग्रहण करा** **गुण : २०**

**उत्तर** – प्रस्तावना – लेखकाचा परिचय – कवितेचे शीर्षक – काव्याचा भावार्थ – सौंदर्य – वृत्त – अलंकार – छंद – संकल्पना इ.

**गृहपाठ – ४**

**प्रश्न – पु. ल. देशपांडे यांच्या व्यक्ती आणि वल्लीमधील सखाराम गटणे व परोपकरी गंपू या व्यक्तींची स्वभाव वैशिष्ट्ये विशद करा.** **गुण : १०**

**उत्तर – प्रस्तावना –** लेखकाचा परिचय – ‘व्यक्ती आणि वल्ली’मधील स्वभाववैशिष्ट्ये – व्यक्ती काल्पनिक असूनही त्यात वास्तवपणा – प्रत्येक व्यक्तीची स्वतंत्र लकब – संवादाची भाषा – सखाराम गटणे – सामान्य व्यक्ती – पण बोलताना सतत साहित्यिक भाषा – लेखकावर नितांत श्रद्धा – प्रेम – आदर – साहित्याची

आवड – साहित्यिक भाषेत सतत बोलत राहिल्यामुळे तोंडात छापखान्याचे खिळे बसविल्याचा भास – साहित्याशी एकनिष्ठता – परोपकारी गंपू – समाजात अवतीभोवती सतत वावरणारी व्यक्ती – स्वतःबद्दल प्रचंड आत्मविश्वास – सतत दुसऱ्याला मोफत सल्ला देणे – नाटक, लग्नसमारंभ वा मर्तिकाचे कार्य असो, सगळीकडे जाण्याची तयारी – सगळ्यांविषयी आपलेपणा – सामाजिक लोकप्रियता – उदा. वडिलांच्या एकसष्टीचा समारंभ – समारोप.

**गृहपाठ – ५**

**प्रश्न – उपक्रम पूर्ण करा.** **गुण : २०**

**स्त्री लेखिका म्हणून आपला वेगळा ठसा उमटविणाऱ्या विभावरी शिरूरकर यांचे अल्पचरित्र लिहा.**

**उत्तर –** त्यांचे नाव – जन्म स्थल, काल – शालेय–महाविद्यालयीन शिक्षण – छंद – नोकरी – व्यवसाय – त्यांच्या साहित्यनिर्मितीची प्रेरणा – त्यांच्या साहित्याला लाभलेले पुरस्कार – त्यांच्या साहित्यनिर्मितीचे स्वरूप – त्यांच्या साहित्याचे वेगळेपण इ.

---

## सत्र ४

## मराठी साहित्य (BMG-401)

## (कमला, विद्रोही कविता, जरा जाऊन येतो)

---

**गृहपाठ – १**

**प्रश्न – सरिता आणि जयसिंग यांच्यात 'कमला'च्या निमित्ताने अंतर निर्माण होते. या विधानाची चर्चा करा.** **गुण : १६**

**उत्तर – प्रस्तावना –** तेंडुलकरांचा परिचय – लेखनवैशिष्ट्ये – सामाजिक ज्वलंत प्रश्न – सामाजिक रूढींच्या विरोधातील प्रश्न.

जयसिंग हा दिल्लीतील इंग्रजी वृत्तपत्राचा पत्रकार – त्यामुळे तो व पत्नी दोघेही दिल्लीला राहतात. सरिता पतिधर्माचे आचरण करणारी – जयसिंग घरात नसतानासुद्धा त्याची सर्व कामे सुरळीतपणे पार पाडणारी – त्याची मर्जी सांभाळण्याचा प्रयत्न करणारी – जेव्हा जयसिंग कमलाला बाजारातून विकत आणतो, ते सरिताला पटत नाही – कमला व सरिता या दोघींमध्ये जेव्हा संवाद होतो, तेव्हा कमला सरिताला विचारते 'तुम्हे कित्ते में खरीदा?' – त्या वेळी सरिताच्या भावविश्वात खळबळ माजते. स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव होते – जयसिंग आपल्यालासुद्धा गुलामासारखा वागवतो या विचारांमुळे त्या दोघांच्यात अंतर निर्माण होते. समारोप.

**गृहपाठ – २**

**प्रश्न – मोकाशींच्या कथा त्यांच्या चिंतनशीलतेचा प्रत्यय देतात, या विधानाची चर्चा करा.** **गुण : १६**

**उत्तर – प्रस्तावना –** मोकाशी यांचा थोडक्यात परिचय – त्यांचे कथालेखन सहज, सुलभ, मध्यमवर्गीय अनुभवाशी निगडित – कथांमधील चिंतनशील वृत्तीवर त्यांच्या लेखन शैलीत भर आहे – 'जरा जाऊन येतो' या कथेतील गणेश ओक – त्यातील त्याचे जीवनविषयक चिंतन – तसेच 'आमोद सुनासि आले'

या कथेतून 'रामजी' या पत्राद्वारे केलेले जीवनविषयक चिंतन – नेमाणेच्या अडलेल्या गायीची सोडवणूक करताना रामजीला अमृतानुभवातील पुनर्जन्माच्या ओवीचा आलेला प्रत्यय – त्यामुळे रामजीचे नैराश्य दूर होऊन मिळालेले समाधान – त्यातूनच डोकावणारा चिंतनशीलतेचा विचार – समारोप.

**गृहपाठ – ३**

**प्रश्न – मोकाशींच्या कथेची वाङ्मयीन वैशिष्ट्ये 'जरा जाऊन येतो' या कथासंग्रहाच्या आधारे स्पष्ट करा.**
**गुण : १६**

**उत्तर – प्रस्तावना –** लेखक परिचय – कथासंग्रहाची वैशिष्ट्ये – कथालेखन सहज, सुलभ – मध्यमवर्गीयांशी निगडित – तृतीय पुरुषी निवेदन पद्धती – कौटुंबिक अनुभवांवर भर – मोकाशींच्या कथा या कौटुंबिक व सामाजिक अनुभवांवर भर देणाऱ्या वेगवेगळ्या वयातील स्त्री–पुरुषांचे अनुभव – लेखन शैलीत व भाषेत ओघवतेपणा – सहजता – अर्थपूर्ण शब्दरचना – संवादात्मक व वर्णनात्मक पद्धतीचा उपयोग – कथेतील विचारांची सहज मांडणी – साधेपणाने शेवट – समारोप.

**गृहपाठ – ४**

**प्रश्न – 'मी निराश नाही रे' या अर्जुन डांगळे यांच्या कवितेतून कोणता आशावाद प्रकटतो ? गुण : १६**

**उत्तर – प्रस्तावना –** कवीचा परिचय – दलित पँथर संघटनेचे संस्थापक – कथा–कवितांचे वैचारिक लेखन – सामाजिक चळवळीत सक्रिय – त्यांच्या कवितेत समाजजीवनाच्या कुरूपतेचे विचित्र चित्रण – प्रभावीपणे पण तितक्याच स्वाभाविकपणे – मानवी मनाची सोशीकता व समंजसपणा आढळतो – झुंजार व आशावादी प्रतिमा – काव्याचे स्वरूप.

भारतीय समाजव्यवस्थेत बहुजन समाजाचे रितेपण आणि अप्रस्तुताला समस्या मानण्याचा बौद्धिक कोतेपणा – यांचे वास्तवदर्शन – उदास असूनही प्रत्यक्षात त्यांच्या अंतःकरणातील आशावाद कळंजून गेला नाही – लोकशाही समाजरचना ही मृगजळाप्रमाणे फसवी ठरली – एक उजळ शिल्पित पाहत आहेत – प्रत्यक्ष झुंज देणाऱ्यांना जपण्यातच भविष्यकाळ प्रकाशमय शिल्पकृती येणार – हा आशावाद – त्यामुळे कवी उल्हासित – समारोप.

**गृहपाठ – ५**

**प्रश्न – विद्रोही कविता या काव्यसंग्रहातील 'नाही लढण्याविण मुक्ती' व 'माणूस' या कवितांचे रसग्रहण करा.**
**गुण : १६**

**उत्तर – प्रस्तावना –** 'नाही लढण्याविण मुक्ती' ही कविता 'किसन फागुजी बनसोड' यांची. कवितेची वैशिष्ट्ये – बहुजन समाजाच्या वास्तव – जीवनाची परवड – काव्यात प्रथमच व्यक्त – वेदनेला शब्दरूप धारण – कविता अलंकार सृष्टीत न रमणारी – त्यामुळेच अंतस्थ उफाळणाऱ्या लाव्हाची गाज – अस्पृश्यतेच्या अन्यायाविरुद्ध प्रखर लढा – दलित समाजात चैतन्य व अस्मिता निर्माण करण्याचे काम – महार ही जमात लढाऊ – हा ऐतिहासिक वारसा सांगून, आपल्या जातीला लढणे हाच मुक्तिमंत्र – हा कविसंदेश – मुक्तीसाठी स्वतःच्या आचरणात बदल – मोक्ष वेगळा व धार्मिक, आर्थिक व सामाजिक दास्यातून सोडवणूक म्हणजेच मुक्ती.

'माणूस' ही कविता त्र्यंबक सपकाळे यांची – शिक्षण मॅट्रिकपर्यंत. सवर्णांच्या व गावकऱ्यांच्या जाचामुळे बालवयातच बहिष्काराचा धडा – आंतरिक उत्स्फोटाचा प्रचंड नाद व त्याचे पडसाद – आक्रमक पण उग्र

काव्यात्मक असे कवितेचे स्वरूप – लोकभाषेचा ठसका – भावलयीमुळे संपन्न – उद्धाराची वाट पाहणाऱ्या बांधवांना उद्देशून – आत्मतेज जागवा व आपणच आपले भाग्यविधाते व्हा. हा संदेश – समारोप.

***